राष्ट्रीय
कुष्ठरोग
निर्मूलन
कार्यक्रम

# चार चौघात सांगण्यास नको लाज ।
# कुष्ठरोग हमखास बरा होतो आज ॥

## लोक शिक्षणातून कुष्ठरोग निर्मूलन




ALERT-INDIA

# कुष्ठरोगाची ओळख व रोगमुक्ती


1

# कुष्ठरोग कुष्ठजंतूमुळे होणारा एक संसर्गजन्य रोग आहे.

- **कुष्ठरोग** सूक्ष्म **कुष्ठजंतुमुळे होणारा**, एक **संसर्गजन्य** (सांसर्गिक -एकापासून दुसऱ्याला होणारा) **रोग आहे**.
- कुष्ठबाधिताची संसर्गिकता ही **जंतुपरीक्षणानेच कळते**, **विकृती** किंवा **विद्रूपता बघून नाही**.
- कुष्ठरोग **अनुवंशीक रोग नाही**, **आधुनिक औषधोपचाराने** कुष्ठरोग **खात्रीपूर्वक पूर्णपणे बरा होतो**.
- **कुष्ठरोग** एक **सामान्य** आणि **कुठल्याही स्थितीत पूर्णपणे बरा होणारा रोग आहे**, हा **समज** समाजात **प्रस्थापित करा**.
- कुष्ठरोग हा **महारोग**, **रगतपिती**, **कोड**, **झडयारोग**, **झूजाम**, **पापरोग**... (आपण आपल्या भागात कुष्ठरोगाची प्रचलित ओळख ................ निश्चित करा) **भिकाऱ्यांचा रोग म्हणूनही ओळखला जातो**. म्हणूनच कुष्ठरोगाच्या **अद्ययावत वैज्ञानिक माहितीचा प्रसार-प्रचार करा**.

## कुष्ठबाधिताची सांसर्गिकता जंतुपरीक्षणानेच ठरविता येते.

# कुष्ठरोग कुष्ठजंतूमुळे होणारा एक संसर्गजन्य रोग आहे.






सूक्ष्मदर्शक यंत्राखाली कुष्ठरोगाचे जंतू त्वचा विलेपण नमुन्यात लाल काडयांसारखे दिसतात.

## कुष्ठबाधिताची सांसर्गिकता जंतुपरीक्षणानेच ठरविता येते.

2

# कुष्ठरोगाच्या जंतूंचा प्रसार हवेमार्फत होतो.

- **कुष्ठरोग** हा **संसर्गजन्य रोगांमध्ये सर्वात कमी संसर्गजन्य** (सांसर्गिक) **रोग आहे**.
- **सांसर्गिक कुष्ठरुग्णाच्या** श्वासोच्छवातून, खोकल्यातून तसेच शिंकण्यातून बाहेर पडणारे **कुष्ठजंतू हवेतून आपल्यापर्यंत पोहचतात**.
- एकूण **नवीन कुष्ठरुग्णांत** केवळ **10 ते 15 % रुग्णच सांसर्गिक**, म्हणजे **रोग पसरविणारे** असतात.
- कुष्ठरोगाचा **प्रसार MDT** (Multi Drug Therapy) म्हणजेच **बहुविध औषधोपचार** न झालेल्या किंवा **न घेतलेल्या सांसर्गिक कुष्ठरुग्णाकडूनच होतो**.
- MDT औषधोपचाराने **सांसर्गिक रुग्णसुद्धा असांसर्गिक होतो**.

**संसर्गजन्य रोगापैकी कुष्ठरोग सर्वात कमी सांसर्गिक रोग आहे.**

# कुष्ठरोगाच्या जंतूंचा प्रसार हवेमार्फत होतो.



संसर्गजन्य रोगापैकी कुष्ठरोग सर्वात कमी सांसर्गिक रोग आहे.

3

# घाबरू नका, स्वतःची व आप्तस्वकीयांची तपासणी करा.

| त्वचेच्या रंगरूपातील बदल | हातापायातील | अंगावरील डाग/चट्टा त्वचेपेक्षा |
|---|---|---|
| ◆ गुळगुळीत, तेलकट, चमकदार, जाडसर, लालसर त्वचा.<br>◆ कानाच्या जाड पाळी.<br>◆ अंगावरील गांठी. | सुन्नपणा / बधिरता (Gr. 1)<br>◆ स्नायूंचा अशक्तपणा, दुर्बलता व विकृती. चेहरा, हात, पाय (Gr. 2). | ◆ फिक्कट किंवा लालसर रंगाचा<br>◆ सपाट किंवा उंचावलेला. |

- कुष्ठरोगाची **शंकास्पद लक्षणे** बाधित **चेतातंतूशी संबंधित** व **त्वचेवर परिणाम म्हणून दिसतात**.
- कुष्ठबाधिताच्या **नैसर्गिक रोगप्रतिकार शक्तिनुसार** लक्षणे शरीरावर कमी **मर्यादित** किंवा अधिक **विस्तृत** स्वरूपाची व पसरलेली **दिसतात**.
- **जनसामान्यांसाठी** कुष्ठरोगापासून **बचाव करणारी रोगप्रतिबंधक लस** (Vaccine) **उपलब्ध नाही**.

## चेहरा व हातापायावर सहज दिसणारी ३ शंकास्पद लक्षणे ओळखा.

# घाबरू नका, स्वत:ची व आप्तस्वकीयांची तपासणी करा.

## 1



- त्वचेच्या रंगरूपातील व पोतातील (skin texture ) बदल.
- कानाच्या जाड पाळी
- अंगावरील गाठी.

## 2



- हातापायातील सुन्नपणा / बधिरता.
- असमर्थता व शारीरिक विकृती.

## 3



अंगावरील डाग/चट्टा त्वचेपेक्षा

- फिक्कट किंवा लालसर रंगाचा
- सपाट किंवा उंचावलेला .

## चेहरा व हातापायावर सहज दिसणारी ३ शंकास्पद लक्षणे ओळखा.

आपल्यापैकी 98 % लोकांचा कुष्ठरोगाविरुद्धच्या नैसर्गिक रोगप्रतिकार शक्तिमुळे बचाव होतो.

# त्वचेच्या रंगरूपातील बदल जसे ...

सर्वसामान्य दिसणाऱ्या कुष्ठबाधित व्यक्तिमध्ये **त्वचेच्या रंगरूपातील सुरुवातीचे बदल**... जसे, **गुळगुळीत** (Smooth), **तेलकट** (Oily), **चमकदार** (Shiny), **जाडसर** व लालसर (SOS) **संक्रमित त्वचा** (Infiltratrated skin) पुढील **लक्षणांसोबत** दिसून येतात.

- **कानाच्या जाड** झालेल्या **पाळी**.
- **भुवयांचे केस** बाहेरच्या बाजूने विरळ होणे/**झडणे**.
- नाक चोंदणे, **नाकातून रक्तस्त्राव होणे**, बसके /**चपटे नाक** .
- **घोगरा आवाज**.

**तेलकट, जाडसर, गुळगुळीत, मऊ त्वचा व कानाची जाड पाळी.**

# त्वचेच्या रंगरूपातील बदल जसे ...




तेलकट, जाडसर, गुळगुळीत, मऊ त्वचा व कानाची जाड पाळी.

# त्वचेच्या रंगरूपातील बदल जसे ...

**जाडसर** व लालसर, **गुळगुळीत** (Smooth), **तेलकट** (Oily), **चमकदार** (Shiny), (SOS) **संक्रमित त्वचा**.


- **त्वचेच्या रंगाच्या** किंवा **लालसर दुखऱ्या गाठी**सह **ताप येणे**.
- **लाल डोळा**
- मोदरा आल्याची व **हातापायात मुंग्या** / विरविरि आल्याची जाणीव अशी **तक्रार असू शकते**.
- **हातापायावरील सूज**.
- केळ्यांसारखी दिसणारी **सुजलेली बोटे**.
- **हातापायांवर** हातमोजे / पायमोजे घालण्याच्या (glove and stocking) भागावर संवेदनेचा अभाव किंवा **बधिरता असू शकते**.

**जाडसर, तेलकट, गुळगुळीत, मऊ चमकदार त्वचा, हातांपायांवरील सूज, मुंग्या येणे व अंगावरील गांठी.**

# त्वचेच्या रंगरूपातील बदल जसे ...

## 1

## ओळखा व तपासून घ्या.





चमकदार, तेलकट व गुळगुळीत त्वचा



जाडसर त्वचा



हातापायावरील सूज



अंगावरील गाठी

**जाडसर, तेलकट, गुळगुळीत, मऊ चमकदार त्वचा, हातांपायांवरील सूज, मुंग्या येणे व अंगावरील गांठी.**

# चेहऱ्यावरील असमर्थता व विकृती...

- **सुन्न–बधिर** /संवेदनाहीन **हातपाय**.
- **चेहरा** व **हातापायाची शारीरिक विकृती**.
- **हातापायात मुंग्या** किंवा मोदरा येणे.
- **सांध्याच्या** ठिकाणी कोपर, ढोपर व घोट्याचे **चेतातंतू दुखणे** वा **वेदना होणे**.
- अश्या **तक्रारी कुष्ठरोगाचे लक्षण** असू शकते, त्या **गांभीर्याने घ्या**.

**कुष्ठजंतूच्या** चेतातंतूतील **अस्तित्वामुळे** मुख्यत्वे **त्वचेचे** व **चेतातंतूचे** कार्य कायमस्वरूपी बाधित होते. वारंवार इजा/जखमा होवून **असमर्थता** आणि **विकृती येते** नंतर **अवयवाचे नुकसान होते**.

1. त्वचेची बधिरता / **सुन्नपणामुळे अवयवाचे नुकसान होते**.
2. **त्वचेची लवचिकता**, **शुष्कपणा** व कोरडेपणामुळे **भेगा** पडून **सांध्याच्या हालचालीत** त्वचेच्या **मर्यादा** आल्याने **सांधे अखडतात**/ जखडतात.
3. **चेहरा**, **हात** व **पायाच्या स्नायूंच्या अशक्तपणा** वा लकवाग्रस्त झाल्याने अवयवाची **कार्यक्षमता बाधित** होवून **विकृती तयार होते**.

**डोळ्यांची आवश्यक व योग्य काळजी घेतल्यास, अंधत्व टाळून रोजचे कामकाज सहज सुलभ करून कार्यक्षमता सुधारता येते.**

# चेहऱ्यावरील असमर्थता व विकृती...

**2**

**ओळखा व तपासून घ्या.**















**डोळ्यांची आवश्यक व योग्य काळजी घेतल्यास, अंधत्व टाळून रोजचे कामकाज सहज सुलभ करून कार्यक्षमता सुधारता येते.**

7

# हाताची असमर्थता व विकृती...

हाताचे चेतातंतू बाधित झाल्याने त्वचा सुन्नबधिर, स्नायू अशक्त आणि दुर्बल होवून असमर्थता, विकृती व विद्रूपता येते.

- **सुन्नपणा**/ बधिरतेमुळे हातास **नकळत वारंवार जखमा**/ इजा होते.
- **त्वचा फाटते**/ भेगा पडतात. घामाच्या व तेलाच्या ग्रंथी बाधित झाल्याने कोरडेपणामुळे त्वचा **शुष्क होते**, **ओलावा** व **लवचिकता कमी होते**.
- **वस्तु चिमटीत पकडणे**, बटन लावण्यात, वस्तू नीट पकडण्यात आणि उचलण्यात अडचणी येतात, वस्तु हातातून **निसटून जातात**.
- **मनगटातून लुळा हात :** स्नायूंच्या अशक्तपणा व दुर्बलतेमुळे हाताची **कार्यक्षमता बाधित होते**. वस्तू पकडून वर उचलता येत नाही.
- **वाकडी बोटे** : सांध्यात स्नायूंच्या सामान्य हालचाली व व्यायाम न केल्याने **सांधे जखडतात**/ कडक होतात. **सांध्याच्या हालचाली मर्यादित होतात.**
- **आखूड बोटे :** हातापायात मोजे घालण्याच्या ठिकाणी/भागांत बधिरता असल्याने थंड-गरम, खडबडीत व गुळगुळीत पृष्टभाग, कडक-मऊ, तीक्ष्ण धारदार-बोथट अनुकूचीदार वस्तूंमधील फरक करता न आल्याने **जखमा, जळणे, भाजणे, कापणे** यामुळे **इजा** व **फोड होतात**.

**इजा / जखमांपासून दररोज काळजीपूर्वक बचाव आणि अशक्त व लकवाग्रस्त कमजोर स्नायूचे व्यायाम करून हाताची कार्यक्षमता वाढवा.**

# हाताची असमर्थता व विकृती...







## 2

## ओळखा व तपासून घ्या.









इजा / जखमांपासून  दररोज काळजीपूर्वक बचाव आणि अशक्त व लकवाग्रस्त कमजोर स्नायूचे व्यायाम करून हाताची कार्यक्षमता वाढवा.

# पायाची असमर्थता व विकृती...

- **पायातून चप्पल निसटून जाणे.**
- **पायातील सुन्नपणा / बधिरता :** थंड–गरम, खडबडीत व गुळगुळीत पृष्टभाग, कडक, मऊ, धारदार, तीक्ष्ण , बोथट वस्तूंमधील फरक करता न येणे.
- **नकळत वारंवार होणाऱ्या जखमा :** जळणे, कापणे, भाजणे, फोड येणे. कुष्ठबाधिताची कुठलीही जखम **आराम दिल्यास** / दबावमुक्त केल्यास, **स्वच्छ ठेवल्यास** आणि **झाकून ठेवल्यास** निश्चित **बरी होते.**
- **तळपायातील कोरडेपणा / शुष्कता :** भेगा, फोड किंवा इजा / जखम.
- **घोट्यातून लुळा पाय :** पाय आपटीत चालणे.
- **वाकडी बोटे**
- **आखूड बोटे**

**सुरक्षित चप्पल वापरून इजा / जखम व फोड यापासून सुन्नबधिर पायाचे संरक्षण करा, दररोज काळजी घ्या आणि विकृती व विद्रूपता टाळा.**

# पायाची असमर्थता व विकृती ...

## 2

## ओळखा व तपासून घ्या.















**सुरक्षित चप्पल वापरून इजा / जखम व फोड यापासून सुन्नबधिर पायाचे संरक्षण करा, दररोज काळजी घ्या आणि विकृती व विद्रूपता टाळा.**

9

# त्वचेच्या रंगपेक्षा फिक्कट / लालसर डाग.

- कुष्ठरोगाची सुरूवात एक किंवा **अनेक डागांनी होऊ शकते**.
- कुष्ठरोगाचे डाग शरीरावर **कुठेही येवू शकतात**, त्यामुळे पाठीवरील किंवा कपड्यांनी **झाकल्या जाणाऱ्या जागेवरील डाग** /चट्टे **लक्षात येत नाहीत**.
- **दुर्लक्षली जातात** किंवा सामाजिक **भीतीपोटी लपविली** जातात.
- **औषधोपचार पूर्ण होऊन कुष्ठरोग पूर्णपणे बरा होऊनसुद्धा काही डाग/चट्टे व्रणांच्या** व कुष्ठरोगाच्या लक्षणांच्या **स्वरूपात** कायमची **मागे राहू शकतात**, यासाठी परत **कुष्ठरोगाचा औषधोपचार घेण्याची गरज नसते**. आपल्या डॉक्टरांकडून आपल्या **शंकांचे समाधान करून घ्या**.

**डाग चट्टे अंगावर कुठेही येवू शकतात, एक किंवा अनेक,**
**सपाट किंवा उठावदार, आकाराने लहान किंवा मोठे असू शकतात.**

# त्वचेच्या रंगपेक्षा फिक्कट / लालसर डाग.

## 3

**ओळखा**
**व**
**तपासून**
**घ्या.**







**डाग चट्टे अंगावर कुठेही येवू शकतात, एक किंवा अनेक,**
**सपाट किंवा उठावदार, आकाराने लहान किंवा मोठे असू शकतात.**

# त्वचेच्या रंगपेक्षा फिक्कट / लालसर डाग.

- **सर्वच डाग कुष्ठरोगाचे नसतात.**
- दुधासारखे **पांढरे डाग कुष्ठरोगाचे नसतात**. सफेद पांढऱ्या रंगाचे डाग कोढ किंवा व्हिटीलिगो ह्या विकारात त्वचेतील मेल्यानिन रंगद्रव्याच्या कमतरतेमुळे येतात. ह्याचा कुष्ठरोगाशी कुठलाच संबंध नाही व एकापासून **दुसऱ्यास पसरत नाही**.
- **जन्मडाग**, **कमी कालावधीत** ऋतुमानानुसार **येऊन जाणारे** बहुतांश **डाग कुष्ठरोगाचे नसतात**.
- म्हणूनच, **कुष्ठरोगाची लक्षणे** किंवा कुष्ठरोगाच्या **लक्षणांत अचानक बदल** किंवा **वाढ** दिसताच **डॉक्टरांना भेटा**, तपासून घ्या.
- आपले **नातेवाईक**, **सगेसोयरे**, **मित्र मंडळी**, **आप्तस्वकीय** यांच्यात कुष्ठरोगाच्या **शंकास्पद लक्षणांचा शोध घ्या** व शंका असल्यास **तपासणीसाठी प्रवृत्त करा**.

**लहान-मोठा, तरुण-वृद्ध, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, झोपडपट्टी बिल्डिंगमध्ये , कुणाच्याही अंगावर कुष्ठरोगाची लक्षणे दिसू शकतात.**

# त्वचेच्या रंगपेक्षा फिक्कट / लालसर डाग.

# 3

## ओळखा
## व
## तपासून
## घ्या.











लहान-मोठा, तरुण-वृद्ध, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, झोपडपट्टी बिल्डिंगमध्ये , कुणाच्याही अंगावर कुष्ठरोगाची लक्षणे दिसू शकतात.

- केवळ **शारीरिक तपासणी** करून **बहुतांश रुग्णांचे निदान** व **उपचार सहजतेने करता येतो**.
- **कुष्ठरोग** म्हणजे **विकृती** व **विद्रूपता** ह्या समजामुळे व **सामाजिक भीतीपोटी कुष्ठरोगाची लक्षणे लपवू नका** किंवा **माहितीच्या अभावी दुर्लक्षू नका**.
- **कुष्ठबाधिताने कुटुंबियांच्या सहवासात** खात्रीपूर्वक **औषधोपचार पूर्ण करून जवाबदारीपूर्ण** उत्तम **सामाजिक स्वास्थ्य सांभाळा**.
- कुष्ठरोगाचा **उपचार पूर्ण झाल्यावर व्रणांच्या स्वरूपात** कायमची मागे राहून गेलेली **कुष्ठरोगाची लक्षणे**, असमर्थता , सुन्नबधिरता व विकृती **यांची दररोज नियमितपणे जीवनभर** अत्यंत **आवश्यक काळजी घ्या**. यामुळे त्या उत्तरोत्तर **वाढणार नाहीत** आणि सहजपणे **सुधार घडवून**, विकृती व विद्रूपतेस **मर्यादा** (आळा) **घाला**. **शंकांचे समाधान** करून घ्या, सहजतेने **कार्यक्षम** व **सन्मानपूर्ण** कौटुंबिक आणि **सामाजिक हक्काचे जीवन जगा**.

# शरीराच्या उघड्या भागांवर कुष्ठरोगाच्या प्रमुख तीन गटातील शंकास्पद लक्षणांचा सहजपणे शोध घ्या व डोळसपणे संशयित शोधून निश्चित रोगनिदानासाठी पाठपुरावा करा.

## तीन प्रमुख लक्षणे.

**1** त्वचेच्या पोतातील (skin texture) व रंगरूपातील बदल. जाडसर, तेलकट, गुळगुळीत, चमकदार मऊ त्वचा. अंगावरील त्वचेच्या रंगाच्या किंवा लालसर दुखऱ्या गांठी **बघा, सामान्य त्वचेत फरक करा.**

**2** हातांपायतील सुन्नपणा व बधिरता. चेहरा, हातापायतील असमर्थता आणि विकृती. **निरीक्षण करा व लक्षात घ्या.**

**3** अंगावरील त्वचेपेक्षा हलक्या फीकट रंगाचे सपाट किंवा लालसर रंगाचे उठावदार डाग चट्टे. **डाग / चट्टे शोधा.**

| | तक्रारी ऐकणे, चौकशी व योग्य दखल घेणे. | असमर्थता व शारीरिक विकृती तपासणी. | |
|---|---|---|---|
| **चेहरा** | १. डोळ्यातून पाणी येणे.<br>२. अंधुक दिसणे.<br>३. तीव्र प्रकाश खुपणे, सहन न होणे.<br>४. नाक चोंदणे व नाकातून रक्त येणे.<br>५. तोंडातून पाणी ओघळणे. शीळ वाजविता न येणे किंवा गाल फुगवून ठेवता न येणे.<br>६. घोगरा आवाज. | १. लाल डोळा<br>२. पापण्यांची उघडझाप वारंवारता कमी होणे.<br>३. भुवयांचे केस बाहेरच्या बाजूने विरळ होणे.<br>४. जाड झालेल्या कानाच्या पाळी. | १. डोळ्याच्या पापण्या बंद न होणे.<br>२. आंधळेपणा / अंधत्व<br>३. बसके/चपटे नाक.<br>४. वाकडे तोंड |
| **हात** | १. हातांपायात मुंग्या, झिनझीण्या वा मोदरा येणे.<br>२. कोपर, ढोपर व घोट्याच्या ठिकाणी (चेतातंतुमध्ये) दुखणे किंवा वेदना होणे.<br>३. सांध्यावरील सूज.<br>४. थंड-गरम, खडबडीत व गुळगुळीत पृष्ठभाग, कडक व मऊ, धारदार, तीक्ष्ण व बोथट वस्तूमध्ये फरक करता न येणे.<br>५. नकळत वारंवार जळणे, कापणे, भाजणे व इजा होणे.<br>६. वस्तू चिमटीत पकडणे किंवा कपडे घालतांना बटन लावण्यात अडचणी येणे. वस्तू हातातून निसटणे. | १. तळ-हातापायातील सुन्नपणा/ बधिरता.<br>२. हातापायाच्या पंजावरील सूज, हाताची बोटे केळीच्या घड्यातील फन्यासारखे दिसणे.<br>३. तळहातापायाच्या त्वचेचा कोरडेपणा, भेगा, फोड व जखमा. | १. वाकडी बोटे.<br>२. संध्यात घट्ट / जखडलेली बोटे.<br>३. आखूड झालेली बोटे.<br>४. मनगटातून लुळा पडलेला हात.<br>५. घोट्यातून लुळा पडलेला पाय. |
| **पाय** | ७. पाय आपटीत चालणे, पायातून चप्पल निघून जाणे. | | |

**इतर** १. **कुष्ठरोगाच्या लक्षणात होणारे बदल.** अचानक, MDT औषधोपचारादरम्यान किंवा औषधोपचार पूर्ण झाल्यानंतर.
२. **ताप येणे.** जखम असतांना, किंवा अंगावर वारंवार येणाऱ्या गांठीसह.

- शरीराची संपूर्ण तपासणी डोक्यापासून पायांपर्यंत झाकलेल्या भागांसह (जसे.. छाती, पोट, पाठ व कंबरेखालील भाग) आदरपूर्वक सन्मानाने उत्तम प्रकाशझोतात करावी, उन्हात किंवा उघड्यावर करू नये.
- पुरुष कार्यकर्त्याने स्त्रीची तपासणी दुसऱ्या स्त्रीच्या उपस्थितीत करावी.

- काही रुग्णांमध्ये सुरवातीच्या अवस्थेत **कुष्ठरोगाचे डाग आपोआप बरे होण्याची खात्री नसते**. बहुतांश रुग्णांत चट्ट्याची आकारात किंवा संखेत वाढ होऊन कुष्ठरोगाच्या निश्चित प्रकाराकडे वाटचाल होते. म्हणून **निदान निश्चित झालेल्या प्रत्तेक कुष्ठरुग्णाने** योग्य व **पूर्ण औषोधोपचार घेणे** अतिशय महत्वाचे आहे.
- **बहुविध औषधोपचाराने कुष्ठरोग पूर्णपणे बरा होतो**.
- विकृतीची तीव्रता व श्रेणीचे मूल्यांकन **अपंगांचे प्रमाणपत्र** व शासनाच्या विविध योजनांच्या **लाभासाठी** कुष्ठबाधितास **पात्र ठरविते, कायद्याचे** परिणामी **मानवी हक्कांचे संरक्षण देते.**
- कुष्ठबाधितास त्याचे, त्याच्या **कुटुंबात** व **समाजात** सर्वसामान्य **हक्काचे स्थान द्या.**

## तपासून घ्या तीन गोष्टी, कुष्ठरोगापासून मिळेल मुक्ती.


1

अंगावरील फिक्कट सपाट, लालसर उंचावलेले डाग / चट्टे



2

हातापायातील सुन्नपणा / बधिरता. चेहरा, हातापायातील असमर्थता आणि शारीरिक विकृति.



3

त्वचेच्या रंगरूपातील व पोतातील (skin texture) बदल. अंगावरील गाठी



## डॉक्टरांकडून तपासणी, उपचार आणि शंका-समाधान

### संवेदना तपासणी

1

फिक्कट किंवा लालसर चट्यावरील संवेदनेची तपासणी.



### चेतातंतूची चाचपून तपासणी

2

आकारमानाने जाड किंवा दुखऱ्या चेतातंतूच्या कार्यक्षेत्रात संवेदनेची तपासणी.



### त्वचा विलेपन तपासणी

3

त्वचेला छेद देऊन घेतलेल्या उत्तकयाच्या नमुन्याचे जंतू परीक्षण.



**6 ते 12 महिन्यांत कुष्ठरोग पूर्णपणे बरा होतो**, म्हणूनच **अशा व्यक्तिस कुष्ठरोगी संबोधणे**, मानणे एक प्रकारे **मानवी हक्कांचे उल्लंघन** व **सामाजिक अपराध आहे.**

13

# दिसताच लक्षणे करा विचार, टाळू नका औषधोपचार।

- कुष्ठरोग होण्याचे **मूळ कारण कुष्ठजंतू आहे**, म्हणूनच **बहुविध औषधोपचार** (MDT - Multi Drug Therapy) हाच कुष्ठरोगावर **खात्रीचा, आधुनिक, अत्यंत गुणकारी व प्रभावी औषधोपचार आहे.**
- MDT **औषधोपचाराने सांसर्गिक रोगी असांसर्गिक होतो.** एकाच मात्रेने 99.99% कुष्ठजंतू मारले जातात आणि **औषधोपचार झालेला कुठलाच कुष्ठबाधित रोगप्रसार करत नाही.**
- **जागतिक आरोग्य संघटनेने** MDT **स्त्रीच्या गरोदरपणात** (pregnancy), **स्तनपान करण्यास** आणि **कुष्ठरोगप्रतिक्रिया** असल्यातरी, MDT **देणे सुरक्षित** असल्याचा पुरस्कार केला आहे. **उपचार थांबवू नये.**

# दिसताच लक्षणे करा विचार, टाळू नका औषधोपचार।



सर्व सरकारी व
निमसरकारी दवाखान्यात
**MDT** आधुनिक औषधोपचार
मोफत होतो.







औषधोपचारापूर्वी

औषधोपचारानंतर





त्वरित निदान व नियमित **MDT** उपचाराने ६ ते १२ महिन्यांत कुठल्याही स्थितीतील कुष्ठरोग पूर्णपणे बरा होतो, विकृतीही टाळता येते.

# LEPROSY

"A **chronic disabling** disease of **man**, mainly attacking **nerves** and skin, caused by the leprosy bacillus, **mildly** communicable, **diagnosable**, **curable** and of good prognosis - **If** recognised **early**, treated **properly**".

Teachng Aids at Low Cost (TALD), Institute of Child Health London WC1N 1EH. Slide No. Lp 1.

## LEAP

**Community-based approach to reduce leprosy burden; incidence, morbidity and stigma-discrimination.**

Changing lives ALERT-INDIA since 1978

Say NO to Fear and Exclusion

**END . LEPROSY . TOGETHER .**

Supported by HSBC


***Published by:***
**A**ssociation for **L**eprosy **E**ducation, **R**ehabilitation and **T**reatment - India
B-9, Mira Mansion, Sion (West), Mumbai – 400 022.

**Tel:** +91-22-24033081 / 2
**Email:** info@alertindia.org | **Website:** www.alertindia.org

Health Education & Resource Centre

***Concept, text & design:***
***ALERT-INDIA,***
*Technical Resource & Training Unit (TRTU)*
alertrajeev@gmail.com



Like us on @alertindialeprosyngo Subscribe on @Alertindiango Follow us on @alertindiango @ALERT_INDIA_ @ALERT-India